## वठी पिस्टल, एक जिवंत काडतूस व १ मॅग्झीनसह एकास अटक

# इतवारा उप विभागीय पोलीस अधिकारी यांच्या गुन्हे शोध पथकाची कामगिरी

**नवीन नांदेड–** इतवारा उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या गुन्हे शोध पथकाने ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीत पेट्रोलिंग करत असतांना एका संशयीत युवकाला अटक केली. त्याच्याकडून गावठी पिस्टल, १ जिवंत काडतूस व १ मॅगझीन असा मुद्देमाल जप्त केला आहे.

लोकसभा निवडणुक अनुषंगाने इतवारा उप विभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक यांनी दि. २३ मार्च रोजी गुन्हे शोध पथकाला रेकॉर्ड वरील आरोपी, पाहिजे फरारी, वॉरंट मधील आरोपी शोधण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार अंमलदार पेट्रोलिंग करीत ढवळे कॉर्नर येथे पोहचले. २० ते २२ वर्षाचा युवक गावठी पिस्टल घेऊन अन्सारी हॉस्पिटल समोर सय्यद टी स्टॉल जवळ वसरणी नांदेड येथे थांबला असल्याची खबर मिळाली.

ही माहिती इतवारा उप विभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक यांना देण्यात आली. त्यानंतर गुन्हे शोध पथकाचे अंमलदार यांनी वसरणी येथील अन्सारी हॉस्पिटल समोर सय्यद



टी स्टॉल जवळ सापळा लावला. यात संशयित व्यक्तीच्या हलचाली वर लक्ष दिले असता गंगाप्रसाद दयानंद महाजन (वय २२, व्यवसाय मजुरी रा. तामसा ता. हदगाव ह. मु. शंकर नगर वसरणी) याची अंगझडती घेण्यात आली.

यावेळी त्याच्याकडून विनापरवाना एक गावठी पिस्टल (अग्नीशस्त्र) व एक जिवंत काडतुस आढळून आले. पोलीस कॉस्टेबल संतोष बेल्लुरोड यांनी दिलेल्या फिर्याद वरुन पो.स्टे नांदेड ग्रामीण ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात. पोलीस निरीक्षक आयलाने यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक विजयकुमार कांबळे हे पुढील तपास करीत आहेत.

आरोपीस न्यायालयात हजर केले असता न्यायलयाने दि.२६ मार्च पर्यंत पोलीस कोठडी दिली आहे. सदर कार्यवाही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक अर्जुन मुंडे, पोलीस कॉस्टेबल चंद्रकांत स्वामी, संतोष बेल्लुरोड, श्रीराम दासरे, सायबर विभागाचे पोलीस हवलदार राजु सिटीकर यांनी केली आहे.

दै. लोकपत्र.

# गावठी पिस्टलसह जिवंत काडतूस जप्त; डीवायएसपी नायक यांच्या पथकाची का

**नांदेड/प्रतिनिधी**

ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका युवकास ताब्यात घेवून त्याच्याकडून एक गावठी पिस्टल, एक जिवंत काडतूस जप्त करण्यात आले. सदरील कारवाई इतवारा उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक यांच्या पथकाने केली.

आगामी लोकसभा निवडणुक अनुषंगाने रेकॉर्ड वरील आरोपी, पाहिजे फरारी, वॉरंट मधिल आरोपी शोध घेण्यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक गस्तीवर असताना ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत ढवळे कॉर्नर येथे एक युवक बंदूक घेवून फिरत असल्याची माहिती मिळाली.



वसरणी या ठिकाणी सापळ
गंगाप्रसाद दयानंद महाजन वय २२
व्यवसाय मजुरी राहणार मु.पो. तामसा
हदगाव जि. नांदेड ह.मु.शंकर नगर य
ताब्यात अंगझडती घेतली असता त्याच्या
एक गावठी पिस्टल व एक जिवंत काड
मिळून आले. या प्रकरणी ग्रामीण पो
ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला अ
सदरील कारवाई पोलीसअधीक्षक श्री
कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक अबि
कुमार, उपविभागीय पोलीस अधि
सुशीलकुमार नायक यांच्या मार्गदर्शनाख
अर्जुन मुंडे, संतोष बेल्लुरोड, श्री
दासरे, राजू सिटीकर यांच्या पथ
केली.